सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६५

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**( महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण )**

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra
Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्रमांक : मजनिप्रा/२०१८/विधिविषयक/प्र.क्र. १६(२०१८) १९३

दि. २७.०२.२०२०

**प्रकरण क्रमांक १६/२०१८**

**सहयाद्री विद्यालय (केईआय), पूणे येथे १३५ लिटर पाणी वापर प्रति व्यक्ती/प्रति दिन मंजुर करण्या विषयी कमांडर मिलिंद मोरे (से.नि.) यांनी दाखल केलेली याचिका.**

सोबत दि. २७.०२.२०२० चा मजनिप्रा आदेश क्र. १/२०२० जोडला आहे.

सहपत्र : वरील प्रमाणे.

स्वाक्षरी
डॉ. रामनाथ सोनावणे
सचिव, मजनिप्रा

प्रति: माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी.

१. कमांडर मिलिंद मोरे, प्रशासनिक अधिकारी, सहयाद्री विद्यालय–केईआय, पोस्ट तिवई हील्स, गुडलवाडी–राजगुरूनगर, ता. खेड, जि. पूणे ४१०५१३ (याचिकाकर्ता)

२. अधिक्षक अभियंता, पूणे सिंचन मंडळ, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे ४११०११ (प्रतिवादी)

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: + 91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in Website : www.mwrra.org

सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६५

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

( महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण )

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

**आदेश क्रमांक : १/२०२०**

**सहयाद्री विद्यालय (केईआय), पूणे येथे १३५ लिटर पाणी वापर प्रति व्यक्ती/प्रति दिन मंजुर करण्या विषयी कमांडर मिलिंद मोरे (से.नि.) यांनी दाखल केलेली याचिका. प्र.क्र. १६/२०१८.**

कमांडर मिलिंद मोरे,
मुख्य प्रशासक, सहयाद्री विद्यालय
राजगुरूनगर, पूणे ………**याचिकाकर्ता**

विरूध्द

अधिक्षक अभियंता,
पूणे सिंचन मंडळ, सिंचन भवन,
पूणे ………**प्रतिवादी**

**कोरम : श्री के. पी. बक्षी, अध्यक्ष**
**श्री. व्हि. एम. कुळकर्णी, सदस्य (ज.य.अभियांत्रिकी)**
**श्री. विनोद जे तिवारी, सदस्य (विधि)**

**दि. २७ फेब्रुवारी, २०२०**

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: + 91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in Website : www.mwrra.org

## पार्वभूमि

१. सहयाद्री विद्यालय हे पुर्णपणे निवासी असलेले सह शैक्षणिक ICSC विद्यालय कृिष्णामुर्ती फांउडेशन ऑफ इंडिया व्दारे संचालित असुन त्याचे १९९५ मधे उद्घाटन झाले होते. हे पूणे शहरापासून ७० कि.मी. अंतरावर राजगुरूनगर, ता. खेड, पूणे जिल्ह्यात चासकमान जलाशयाजवळ आहे.

२. जल संपत्ती विभागाने प्रारंभीला सहयाद्री विद्यालयाला ७०,००० लिटर पाणी चासकमान तलावातुन नोव्हेंबर १९९५ ते ऑक्टोबर १९९६ करिता घेण्याची हंगामी मंजुरी दिली. त्यानंतर या हंगामी मंजुरीचे दरवर्षी नुतनीकरण होत होते. २००१ मधे सहयाद्री विद्यालय व ज.सं. विभागामधे प्रति दिन ८०,००० लिटर पाणी चासकमान धरणातुन घेण्याचा करार झाला. या कराराचे नुतनीकरण ऑक्टोबर २०१६ पर्यंत झाले.

३. वरील करार संपुष्टात आल्यावर प्रतिवादी यांनी याचिकाकर्त्याला कळविले की कायम स्वरूपी पाण्याच्या आरक्षणासाठी मंजुरी घ्यावी. अर्जदारांचा अर्ज प्राप्त झाल्यावर प्रतिवादीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पूणे यांना ५५ लिटर प्रतिव्यक्ति, प्रति दिन, मजनिप्रा च्या दिनांक २२ सप्टेंबर च्या घरघुती व औद्योगिक वापरासाठी भुपृष्ठ पाणी हक्काचे वितरण नदी खोरे अभिकरणाने करण्याच्या निकषाप्रमाणे, देण्याचा प्रस्ताव पाठवला.

४. प्रतिवादीच्या या कार्यवाहीने व्यथित होऊन याचिकाकर्त्यांने प्राधिकरणाकडे म.ज.नि.प्रा च्या वरील दि. २२ सप्टेंबर २०१७ च्या निकषाच्या अनुच्छेद १२ प्रमाणे दि. १२ ऑक्टोबर २०१८ ला याचिका दाखल केली.

## प्रार्थनेचा सारांश

५. याचिकाकर्त्याने प्राधिकरणाकडे केलेल्या याचिकेत खालील अनुतोष देण्याची प्रार्थना केली आहे.

१) विद्यालयासाठी १३५ लिटर पाणी प्रतिव्यक्ति/प्रतिदिन देण्याची, जेणेकरून मुलभुत गरजा पुर्ण होतील व सांडपाणी व स्वच्छता यंत्रणा परिणामकारक रितीने स्वच्छ ठेवता येईल.

## प्राधिकरणासमोर चाललेले कामकाज.

६. याचिका दाखल केल्यानंतर प्राधिकरणाने दोन सुनावण्या, २७/०८/२०१९ व २३/१०/२०१९ घेतल्या ज्यामधे दोन्ही पक्षांना त्यांची बाजु गुणवत्तावर मांडण्यासाठी समान संधी देण्यात आली.

### अ) दिनांक २७/०८/२०१९ च्या पहिल्या सुनावणी चा सारांश

७. या सुनावणीला कमांडर मिलिंद मोरे (से.नि.) – याचिकाकर्ता व श्री बी. के. शेटे, कार्यकारी अभियंता, चासकमान सिंचन विभाग, पूणे, प्रतिवादींचे प्रतिनिधी हजर होते.

८. प्राधिकरणाने श्री बी. के. शेटे, कार्यकारी अभियंता यांना याचिका प्राप्त झाली की नाही याची विचारणा केली व त्यांनी याचिकेवर का उत्तर दाखल केले नाही याची विचारणा केली. त्यांनी सांगितले की त्यांना याचिकाकर्त्या कडून याचिकेची प्रत मिळाली नाही. तथापी, कार्यकारी अभियंताने सांगितले की याचिकाकर्ता चासकमान जलाशयातुन सरळ पाईपलाईन ने पाणी घेत आहेत. त्यांनी त्यावर वाटर मीटर लावले आहे व याचिकाकर्ता नियमित पणे पाण्याचे बीलाचा भरणा करत आहे.

९. याचिका कर्त्याने सांगितले की हे विद्यालय २५ वर्षे जुने आहे त्याला हंगामी पाणी पुरवठ्याचे वार्षिक आधारावर आरक्षण व त्यानंतर प्रत्येक ५ वर्षाचे आरक्षण मिळाले आहे. वर्ष २०१५ मधे याचिकाकर्त्याने पाण्याचे आरक्षण मंजुर करण्यासाठी अर्ज गेला. परंतु त्या वेळेस अधिक्षक

अभियंत्याने त्यांना हंगामी मंजुरी ऐवजी कायम स्वरूपी आरक्षणासाठी अर्ज करण्यास सांगितले. त्याकरिता अधिक्षक अभियंत्याने त्यांना मजनिप्रा च्या भुपृष्ठ पाणी नदी खोरे अभिकरणाने, त्यांच्या पाण्याचे हक्काप्रमाणे घरघुती/औद्योगिक वापरासाठीच्या ५५ लिटर प्रतिव्यक्ति प्रतीदिन च्या निकषाप्रमाणे अर्ज करण्यास सांगितले.

१०. प्राधिकरणाने याचिका कर्त्याला विचारले की सहयाद्री विद्यालय हे निवासी विद्यालय आहे काय? व तेथे किती विद्यार्थी, कर्मचारी राहतात. त्यावर याचिकाकर्ता म्हणाले की सहयाद्री विद्यालय हे निवासी विद्यालय असून तेथे ३०० विद्यार्थी व २७५ कर्मचारी राहतात.

११. प्राधिकरणाने याचिका कर्त्याला विचारले येथे पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था केली आहे काय? याचिकाकर्ते म्हणाले की त्यांनी पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था सूरू केलेली असुन, पाण्याचा पुर्नवापर व इतर काही काम पुर्ण केले आहे. प्राधिकरणाने सांगितले की जर पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था व पाण्याच्या पुर्णवापराची व्यवस्था केली असेल तर त्यातुन पेयजला व्यतिरिक्त लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था होऊ शकते.

१२. वादातील पक्षकारांची बाजु ऐकून घेतल्या नंतर व जी माहिती अभिलेखात आहे व पक्षकारांनी जे सांगितले ते सर्व ध्यानात घेऊन प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्देश दिलेत.

  १. कार्यकारी अभियंता व अर्जदार यांनी एकत्रितपणे विद्यालय परिसराला भेट द्यावी व खाली दिलेल्या मुद्यांची पडताळणी करावी.

    १. किती कर्मचारी सहयाद्री विद्यालयात हजर आहेत.
    २. गेल्या ५ वर्षात झालेला पाण्याचा वापर.
    ३. गेल्या ५ वर्षात पाण्याचे किती बील आले व त्याची काही बाकी शिल्लक आहे काय?
    ४. शासनाने मंजुरी दिली आहे काय ?

५. काही पाणी साठवण्याची व्यवस्था केली आहे काय ?

२. कार्यकारी अभियंत्याने ६ सप्टेंबर २०१९ पुर्वी विद्यालय परिसराला भेट द्यावी.

३. प्रतिवादीने शपथपत्र तयार करून त्यात वर दिलेल्या मुद्यावर असलेली वास्तविक स्थिति समाविष्ट करून, १३ सप्टेंबर २०१९ पर्यंत, ते सादर करावे.

४. याचिकाकर्त्याने त्यावर उत्तर, काही असल्यास, २० सप्टेंबर पर्यंत दाखल करावे.

**ब) दिनांक १०/१०/२०१९ झालेल्या दुसऱ्या व अंतिम सुनावणीचा सारांश**

१३. या सुनावणीला कमांडर मिलिंद मोरे (से.नि.) – याचिकाकर्ता व श्री बी. के. शेटे, कार्यकारी अभियंता, चासकमान सिंचन विभाग, पूणे, प्रतिवादींचे प्रतिनिधी हजर होते.

१४. प्रतिवादीचे प्रतिनिधी श्री शेटे म्हणाले की प्राधिकरणाच्या मागच्या सुनावणीत दिलेल्या निर्देशा प्रमाणे ते उत्तरा दाखल शपथपत्र सादर करीत आहे आणि त्यांनी क्षेत्र भेटीचा अहवाल सादर केला या अहवालानुसार सहयाद्री विद्यालयात अंदाजे ६३० लोक, कायम तथा हंगामी असे, असतात. शाळेने जानेवारी २०१८ मधे पाण्याचे मीटर बसवले आहे., व त्यांचा सरासरी वापर ७५,००० लिटर आहे. विद्यालयाला ५०% घरघुती व ५०% औद्योगिक दराने पाण्याचे बील भरावे लागते व याची कोणतीही बाकी त्यांच्याकडे शिल्लक नाही. शाळेने ४०,००० लिटर व ५००० लिटर चे सांडपाणी प्रक्रियेचे दोन संयंत्र शाळेत बसवले आहेत. आणि या स्वच्छ केलेल्या पाण्याचा वापर शेतीमधे करण्यात येतो. शाळेत पावसाचे पाणी साठवण्याची यंत्रणा असून त्याची जोडणी पाझर तलावाशी व नंतर पुढे विहीरीशी केली असुन या पाण्याचा वापर आकस्मिक उदभवणाऱ्या परिस्थितित केला जातो.

१५. श्री शेटे यांनी पुढे सांगितले की ०.०२९ द.ल.घ.मी. म्हणजे ८०,००० लिटर प्रति दिवशी याचिका कर्त्यासाठी आधीच्या करारप्रमाणे या अटीवर आरक्षित केले आहे. की ५०% घरघुती व ५०% औद्योगिक दराने पाण्याचे बील भरावे लागेल याचिका कर्त्याने सांगितले की ही पाण्याची मात्रा व दराची अट त्यांना मान्य आहे

**मुद्दे साचेबध्द करणे**

१६. प्राधिकरणाने आलेल्या अर्जाचा विचार करून, त्यात सांगितलेल्या मुद्यांचा विचार करून, पक्षकारांनी सादर केलेले त्यांचे म्हणणे व कागदपत्रे जी अभिलेखात आहेत, ते सर्व लक्षात घेऊन खाली दिलेले मुद्दे विचारार्थ व न्यायार्थ साचेबध्द केले आहेत.

१) अपीलार्थी अपील दाखल करण्यास पात्र आहे काय ?

२) याचिकाकर्ता १३५ लिटर प्र.व्य.प्र.दि. पाणी घरघुती वापरासाठी घेण्याचा हक्कदार आहे काय? जर नाही, तर याचिकाकर्त्याला कायदेशीररित्या किती पाणी मिळण्याचा हक्क आहे ?

**प्राधिकरणाचे निष्कर्ष**

(अ) प्रतिवादीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पूणे यांना ५५ लिटर प्रतिव्यक्ति, प्रति दिन, मजनिप्रा च्या दिनांक २२ सप्टेंबर च्या घरघुती व औद्योगिक वापरासाठी भुपृष्ठ पाणी हक्काचे निकषाप्रमाणे वितरण नदी खोरे अभिकरणाने करण्याचा प्रस्ताव पाठवला त्यामुळे याचिकाकर्ता व्यथित झाले होते.

ब) प्रतिवादीच्या या कार्यवाहीने व्यथित होऊन याचिकाकर्त्यांने प्राधिकरणाला म.ज.नि.प्रा च्या वरील दि. २२ सप्टेंबर २०१७ च्या निकषाच्या अनुच्छेद १२ प्रमाणे याचिका दाखल केली, जो खाली दिल्या प्रमाणे वाचा.

**“१२ अंमलबजावणी मधे झालेल्या अडचणी :**

या निकषाची अंमलबजावणी करण्यात काही अडचणी आल्यास घाऊक घरघुती पाणी वापर संस्था/घाऊक सिंचन पाणी वापर संस्था/नदीखोरे अभिकरण हे प्राधिकरणाकडे, विनिर्दिष्ट याचिके सह, जाऊ शकतात. प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल”

क) वर दिलेल्या तरतुदी प्रमाणे याचिकाकर्ता हा याचिका दाखल करण्यास पात्र आहे.

अशा प्रकारे या मुद्याचे उत्तर होकारार्थी येते.

**(२) याचिकाकर्ता १३५ लिटर प्र.व्य.प्र.दि. पाणी घरघुती वापरासाठी घेण्याचा हक्कदार आहे काय ? जर नाही, तर याचिकाकर्त्याला कायदेशी रित्या किती पाणी मिळण्याचा हक्क आहे ?**

अ) याचिकाकर्त्यांने घरघुती पाणी १३५ लि.प्र.व्य.प्र.दि. मिळण्याची मागणी केली आहे. याचिकाकर्त्यांने पाणी वापराचा जो तपशील दिला आहे त्याप्रमाणे ६० लि.प्र.व्य.प्र.दि. संडास फ्लशींग साठी त्यात सामील आहे. त्यांनी आपल्या मागणीच्या समर्थनार्थ आयएस ११७२ – १९९३ व URDPFI २०१४ ची मार्गदर्शिका दिलेली आहे. याचिकाकर्त्याने युक्तिवाद केला की त्यांना २२ मार्च १९९९ पासून ८०,००० लिटर दररोज पाणी वाटप करण्यात येत असुन, त्यांनी प्रतिवादी सोबत केलेल्या १८/०३/२०११ च्या करारा वर ०.०२९ द.स.घ.मी. प्रतिवर्षी पाणी दिनांक ०१/११/२०१० पासून मिळण्यासाठी सहया केलेल्या आहे.

ब) प्रतिवादीने सांगितले की याचिकाकर्त्याची शाळा गुंडलवाडी, ता. खेड, जि. पूणे येथे आहे. ही शाळा ग्रामीण भागात असल्यामुळे, ते ५५ लिटर पाणी प्र.व्य.प्र.दि. मिळण्याचे हक्कदार आहेत म.ज.नि.प्रा. च्या दि. २२/११/२०१७ च्या निकषाप्रमाणे आहेत.

क) प्राधिकरणाला दिसुन आले की :—

क–१) याचिकाकर्ता ५५ लिटर पाणी प्र.व्य.प्र.दि. म.ज.नि.प्रा. च्या दि. २२/११/२०१७ च्या निकषाप्रमाणे आहेत. त्या शिवाय १५% पाणी वितरणामुळे हानी त्यात जोडली आहे. त्याप्रमाणे या पाण्याची मात्रा ०.०१४५ द.ल.मी. येते.

क–२) याचिकाकर्त्या बरोबर झालेल्या शेवटचा करार दिनांक ३१/१०/२०१६ ला झाला होता. त्या करारपत्राच्या खंड (क्लॉज) ११ प्रमाणे, याचिकाकर्त्याला दरवर्षी ०.०२९ द.ल.घ. मी. पाणी घेण्याची परवानगी होती, या पाण्याचा दर घरघुती व औद्योगिक पाणी वापराचा दर जो वेळोवेळी लागु होता, त्याची सरासरी होती. याचा अर्थ हा दर ५०% घरघुती व ५०% औद्योगिक पाणी वापर दराप्रमाणे लागु होत होता. प्राधिकरणा समोर चालू असलेल्या कामकाजाचे वेळी, याचिकाकर्त्यानी या दराच्या अटी व शर्ती साठी संमती दर्शविली.

क–३) याचिकाकर्त्याला २२ मार्च १९९९ पासुन प्रति दिवशी ८०,००० हजार लिटर प्रमाणे वार्षिक ०.०२९ द.ल.घ.मी. पाणी मंजुर केलेले आहे. त्या ऐवजी त्यांनी १३५ लि.प्र. व्य.प्र.दि. केलेले आहे, जी ०.०३१ द.ल.घ.मी. वार्षिक आहे.

क–४) प्राधिकरणाने वर दिलेल्या प्राधिकाराचा विचार व्यजनिप्रा अधिनियम, २००५ च्या कलम ३१ (बी) च्या संदर्भात केला, जो पुढील प्रमाणे वाचावा:

"३१ (बी) या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये अथवा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा किंवा प्राधिकरणाचा कोणताही आदेश, न्यायनिर्णय किंवा हुकूमनामा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या तरतूदींना अनुसरून महाराष्ट्र जल संपत्ती नियमन प्राधीकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०११ याच्या कलम १ च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी

म्हणजेच, दिनांक १७ सप्टेंबर, २०१० पूर्वी, उच्चाधिकार समितीने किंवा नदी–खोरे अभिकरणाने अथवा राज्य शासनाने ज्यांना परवानगी वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी दिली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा पाणी वाटप गटास ती, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार दिली असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार, ती चालू राहिल आणि अशा व्यक्तिस किंवा पाणी वापर गटास पाणी घेण्यासाठी परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी नव्याने मिळविण्याची आवश्यकता असणार नाही."

याचिकाकर्त्याला जी मंजुरी दिली आहे दि. ११/०९/२०१० च्या पुर्वीची म्हणजे मजनिप्रा (सुधारणा व चालु राहणे) अधिनियम २०११ च्या कलम १ च्या प्रारंभाच्या आधीची आहे. त्यामुळे या अधिनियमाच्या कलम ३१ (बी) अन्वये प्रधिकरणाचे मत आहे की ०.०२९ द.ल.घ.मी. ही दिलेली मंजुरी आज विधि ग्राहय व अबाधित आहे व ती नाकारता येत नाही.

क–५) याचिकाकर्ता ही संस्था आहे. सध्या चालु असलेल्या (टॅरिफ) दराच्या रचनेत वाणिज्यक ग्राहकाचे वर्गीकरण अस्तित्वात नाही. तथापी, मजनिप्र अधिनियम, २००५ च्या कलम २(१)(फ) मधे औद्योगिक व वाणिज्यिक प्रवर्ग हे एकत्र जोडलेले आहे.

क–६) अशाप्रकारे, प्राधिकरणाचे विचार करून बनवलेल्या मताप्रमाणे याचिकाकर्ता ०.०२९ द. ल.घ.मी. पाणी मिळण्याचा हक्कदार आहे. यापैकी ५०% घरघुती व ५०% औद्योगिक दराने पाण्याचे बील भरावे लागते आहे. दिनांक १०/१०/२०१९ च्या सुनावणी दरम्यान दोन्ही बाजुच्या पक्षकारांनी याला संमती दर्शविली आहे. अशाप्रकारे दोन्ही बाजुंचे

कायद्याच्या साच्यात राहुन जे मतैक्य झाले आहे, त्याप्रमाणे हा वाद मिटविण्यात आला आहे.

अशाप्रकारे याचिकाकर्ता १३५ लि.प्र.व्य.प्र.दि. पाणी मिळण्याचे हक्कदार नाहीत परंतु ते दरवर्षी ०.०२९ द.ल.घ.मी. पाणी मिळण्याचे हक्कदार आहेत.

या विचारार्थ असलेल्या मुद्याचे उत्तर अशाप्रकारचे आहे.

**निर्देश**

वादातील पक्षकारांची बाजु ऐकून घेतल्या नंतर व जी माहिती अभिलेखात आहे व पक्षकारांनी जे सांगितले ते सर्व ध्यानात घेऊन, जे मुद्दे साचेबध्द केले होते त्याचा निवाडा करून, प्राधिकरण खालील निर्देश देत आहे :—

१) याचिकाकर्ता दरवर्षी ०.०२९ द.ल.घ.मी. पाणी मिळण्याचे हक्कदार आहेत.

२) ५०% पाणी पुरवठा सध्याच्या पाण्याच्या घरघुती दराप्रमाणे करण्यात येईल. व ५०% पाणी पुरवठा सध्याच्या पाण्याच्या औद्योगिक/वाणिज्यिक दराप्रमाणे करण्यात येईल; दोन्ही पक्षांनी अशा प्रकारे करार करावा.

अशा प्रकारे याचिका, खर्चाविना, निकालात काढली आहे. दिनांक २७/०२/२०२० ला जारी केले.

स्वा.
(विनोद जे. तिवारी)
सदस्य (विधि)

स्वा.
(व्ही. एम. कुळकर्णी)
सदस्य (ज.सं. अभियांत्रिकी)

स्वा.
(के. पी. बक्षी)
अध्यक्ष